**गोदाम दुरूस्तीच्या कामासाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत देण्याबाबत (गोदाम दुरूस्तीची ११ कामे) सन २०१२-१३**

## महाराष्ट्र शासन

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
शासन निर्णय क्र. गोदाबां १०१०/प्र.क्र.३३४/नापु-१६ ब,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२.
दिनांक : २२ जानेवारी, २०१३.

वाचा:-
१) शासन निर्णय क्र.गोदांधु १०१०/प्र.क्र.१३३/नापु-१६ अ, दि.१०.६.२०१०.
२) शासन निर्णय क्र.गोदाधु १०१०/प्र.क्र.३३४/नापु-१६अ, दि.२३.९.२०११ (१)
३) शासन निर्णय क्र.गोदाधु १०१०/प्र.क्र.३३४/नापु-१६अ, दि.२३.९.२०११ (२)
४) शासन निर्णय क्र.गोदाधु १०१०/प्र.क्र.३३४/नापु-१६अ, दि.२३.९.२०११ (३)
५) शासन शुध्दीपत्रक क्र. गोदाम-१०११/५०४/प्र.क्र.५४१/नापु०-१६-ब, दि.२८.११.२०११
६) शासन निर्णय क्र.गोदाधु १०१०/प्र.क्र.३३४/नापु-१६अ, दि.१३.१.२०१२
७) वि.स.उ.स. कार्यायाचे आदेश क्र.विसउस/का-४(अर्थ)/गोबांदु/२०११-१२/प्र.क्र.५७/५४४, दि.२४.२.२०१२
८) शासन निर्णय क्र.गोदाधु १०१०/प्र.क्र.३३४/नापु-१६अ, दि.१९.३.२०१२
९) शासन निर्णय क्र.गोदाधु १०१०/प्र.क्र.३३४/नापु-१६अ, दि. २३.५.२०१२
१०) शासन निर्णय क्र. गोदाम/१०११/३७३/प्र.क्र.५३२/नापु.१६, दि.१८.५.२०११
११) शासन निर्णय क्र. गोदाम/१०११/१९४१/प्र.क्र.५४०/नापु.१६, दि.२७.६.२०११
१२) शासन निर्ण्य क्र. गोदाम/१०११/ प्र.क्र.६५८/ नापु.१६, दि.४.०१.२०१२
१३) शासन निर्णय क्र.गोदाबां १०१०/प्र.क्र.३३४/नापु-१६अ, दि. १२.६.२०१२
१४) शासन निर्णय क्र.गोदाबां १०१०/प्र.क्र.३३४/नापु-१६अ, दि. २१.८.२०१२
१५) शासन निर्णय क्र.गोदाबां १०१०/प्र.क्र.३३४/नापु-१६अ, दि. १७.९.२०१२
१६) शासन निर्णय क्र.गोदाबां १०१०/प्र.क्र.३३४/नापु-१६अ, दि. २७ जून,२०११.

**प्रस्तावना:**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत राज्यातील शिधापत्रिका धारकांना जीवनावश्यक वस्तूंचे वितरण करण्यात येते. भारतीय अन्न महामंडळाकडून प्राप्त होणाऱ्या अन्नधान्याची साठवणूक राज्य शासनाच्या गोदामामध्ये केली जाते. सदरहू राज्य शासकीय गोदामांच्या दुरूस्तीच्या प्रस्तावांची सार्वजनिक बांधकाम विभागाकडून छाननी केल्यानंतर उक्त संदर्भिय क्र.१ येथील शासन निर्णय दि.१०.६.२०१० अन्वये २१४ गोदाम दुरुस्तींच्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तदनंतर सदरच्या २१४ गोदाम दुरूस्तीच्या प्रस्तावापैकी २१२ प्रस्तावांना संदर्भिय क्र.२ येथील शासन निर्णय दि.२३.९.२०११ अन्वये सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. २१२ गोदाम दुरूस्तीच्या प्रस्तावांपैकी ५९ दुरूस्तीच्या प्रस्तावांना संदर्भिय शासन निर्णय क्र.३ व ४ अन्वये निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. तदनंतर संदर्भाधीन दि.१३ जानेवारी, २०१२ व दि.२४.२.२०१२ रोजीच्या आदेशान्वये १४ गोदाम दुरुस्तीच्या कामांना निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. संदर्भाधीन दि.१९.३.२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये ४ गोदाम दुरुस्तीच्या कामास निधी उपलब्ध करून दिलेला आहे. संदर्भाधीन दि.२३.५.२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये १५ गोदाम दुरूस्तीच्या कामास निधी उपलब्ध करून दिलेला आहे. दि.२१ ऑगस्ट,२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये गोदाम

दुरुस्तीच्या ७७ कामांना निधी उपलब्ध करुन दिला आहे. दि.१७.९.२०१२रोजीच्या शासन निर्णयान्वये गोदाम दुरुस्तीच्या कामास निधी उपलब्ध करुन दिला आहे. आता उक्त संदर्भिय शासन निर्णय दि.२७.६.२०११ अन्वये प्रशासकीय मान्यता दिलेल्या गोदाम दुरुस्तीच्या अन्य कामास निधी उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णयः

शासकीय गोदाम दुरुस्तींच्या कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या आदेशामधील अटींच्या अधीन राहून पुढील विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | गोदामाचे नाव | कामाचे स्वरुप | कामासाठी आवश्यक अंदाजित रक्कम (रू.) | सदर आदेशान्वये उपलब्ध करुन द्यावयाची रक्कम (रू.) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | पालघर | पालघर गो.क्र.३ | फर्शी, पत्रे, प्लास्टर, खिडकी इ. | १,५९०,१०० | १,५९०,१०० |
| २ | जळगाव | यावल | यावल | अंतर्गत प्रांगण, परिसर मजबुतीकरण इ. | १,५०२,०५३ | १,५०२,०५३ |
| ३ | अहमदनगर | राहूरी | राहूरी | भिंत्त, कॉंक्रिट, रस्ता, शेड इ. | १,५३४,४९२ | १,५३४,४९२ |
| ४ | चंद्रपूर | मूल | मूल | छत, शटर, खिडक्या इत्यादी | २,६४८,५८० (रु.६,९०,४०४ व ९०५८८३ इतका निधी अनुक्रमे दि.१९.३.२०१२ व १७.९.२०१२ रोजीच्या आदेशान्वये उपलब्ध करुन दिला आहे) | १,०५२,२९३ |
| ५ | अहमदनगर | पाथर्डी | शासकीय गोदाम पाथर्डी | नवीन पत्रे बसविणे, खिडक्यांना ग्रील बसविणे, नवीन फरशी बसविणे, संरक्षण भिंत बांधणे,पत्रे टाकणे, नवीन रस्ते तयार करणे, शटर दुरुस्ती करणे, इत्यादी कामे करणे. | १,५०७,६६४ | १,५०७,६६४ |
| ६ | अहमदनगर | राहूरी | एम.बी.शेड वांबोरी | संरक्षण भिंत बांधणे, जमिनीची सिलींग, कॉंक्रीटने खड्डे बुजवणे, फाटलेले पत्रे पॅचवर्क करणे, लोखंडी दरवाजा बसविणे इ.कामे | २,४७,६९६ | १,७७,४८८ |
| ७ | बीड | गेवराई | शासकीय गोदाम, तलवडा | गिलावा, फरशी, संरक्षण भिंत बांधणे इत्यादी कामे करणे. | १,५३५,५४८ | १,५३५,५४८ |
| ८ | बीड | पाटोदा | शासकीय गोदाम क्र१ पाटोदा | गोदामाची विशेष दुरुस्ती. | १,४२९,६१५ | १,४२९,६१५ |
| ९ | बीड | शिरूर | शासकीय गोदाम शिरुर | गोदाम दुरुस्ती व संरक्षण भिंत बांधणे. | १,४८४,९३३ | १,४८४,९३३ |
| १० | जालना | परतुर | शासकीय गादाम परतुर | कंपाऊंड वॉल बांधणे. | १,४९९,१०० | १,४९९,१०० |
| ११ | बीड | माजलगाव | दिंद्रुड | आवार भिंत बांधणे. | १,०६१,७३४ | १,०६१,७३४ |
| १२ | बीड | गेवराई. | उमापूर | गोदाम दुरुस्ती, सिमेंट टाईल्स, प्लास्टर, जी.सी.आय.सीटस्, लहान खिडक्या इ. | १,१९५,३६६ | १,१९५,३६६ |
| | एकूण | | | | १,७२,३६,८८१ | १,५५,७०,३८६ |
| | | एकूण रुपये एक कोटी पंचावन्न लाख सत्तर हजार तीनशे श्याऐंशी फक्त | | | | |

२. वरीलप्रमाणे निधी उपलब्ध करून दिलेल्या शासकीय गोदाम दुरुस्तीची कामे तातडीने सुरु करण्यात येऊन पूर्ण करण्यात यावीत. गोदाम दुरुस्ती सुरु झाल्यानंतर प्रथम दुरुस्तीचा संपूर्ण तपशील तसेच संबंधित दुरुस्तीचा दरमहा आढावा घेऊन दुरुर्स्तीची प्रगती जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी शासनास सादर करावी.

३. सदरील शासकीय गोदाम दुरुस्तीची कामे पूर्ण होताच त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करण्याची दक्षता जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी घ्यावी.

४. सदर गोदामाच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर सदरचे काम हे मंजूर अंदाजपत्रकाप्रमाणे उत्कृष्ट झाल्याबाबतची खातरजमा संबंधीत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी संयुक्तरित्या करुन तसा स्थल निरिक्षण अहवाल तयार करावा व तो अभिलेखामध्ये जतन करून ठेवावा.

५. दुरुस्तीस विलंब अथवा इतर कारणांनी गोदाम दुरुस्तीस वाढीव खर्च होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.सदरहू निधी ठेव म्हणून वर्ग करता/ठेवता येणार नाही याची नोंद घ्यावी.

६. सन २०१२-१३ या वित्तीय वर्षामध्ये सदर गोदाम दुरुस्तीचा खर्च "मागणी क्रमांक एम-२, मुख्य लेखाशिर्ष २४०८ अन्न साठवण व वखार साठवण, (०३) प्रापण वितरण व किंमत नियंत्रण (०३)(०२) मुफसल, दत्तमत (२४०८ ०१०८) २७ लहान बांधकामे" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

७. सदरहू आदेशान्वये वितरित केलेला निधी मार्च,२०१३ अखेर खर्च न झाल्यास शासनास परत करण्यात यावा.

८. वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ च्या भाग-१ उप भाग-५ मधील अनुक्रमांक ३ व १० नुसार तसेच महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक १३४ नुसार प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार सदरचा आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१३०१२२११०४५७५००६ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( रमेश मु.मनाळे )
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१) उप आयुक्त (पुरवठा), कोकण, नाशिक, नागपूर, औरंगाबाद.
२) वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
३) जिल्हाधिकारी/जिल्हा पुरवठा अधिकारी, ठाणे, जळगाव, अहमदनगर, चंद्रपूर, बीड, जालना.
४) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे, जळगाव, अहमदनगर, चंद्रपूर, बीड, जालना.
५) जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे, जळगाव, अहमदनगर, चंद्रपूर, बीड, जालना.

६) महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा), मुंबई/ नागपूर.
७) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
८) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई (वित्तीय सल्लागार व उपसचिव मार्फत)
९) वित्त विभाग (व्यय-४, अर्थोपाय व अर्थसंकल्प-३), मंत्रालय, मुंबई.
१०) नियोजन विभाग (का-१४११), मंत्रालय, मुंबई.
११) सहाय्यक संचालक (संगणक), लेखा व कोषागारे, मुंबई/नागपूर.
१२) १२.निवड नस्ती/नापु-१६ब